# देवठाणमध्ये बिबट्या पकडण्यासाठी लावले बारा ठिकाणी पिंजरे

## दोन दिवसात नरभक्षक बिबट्या न पकडल्यास निषेध मोर्चा; देवठाण ग्रामस्थांचा इशारा

**अकोले (प्रतिनिधी)–** तालुक्यातील देवठाण गावात बिबट्याने एका तीन वर्षीय बालिकेच्या नरडीचा घोट घेतला. त्यामुळे देवठाण ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात वनखात्या विरुद्ध रोष निर्माण झाला आहे. काल बुधवारी सकाळी या मुलीच्या अंत्यविधी प्रसंगी गावकऱ्यांनी वन अधिकाऱ्यांना धारेवर धरले. नरभक्षक बिबट्या दोन दिवसात न पकडल्यास वन खात्याविरुद्ध शुक्रवारी निषेध मोर्चा काढण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

दरम्यान, वन विभागाने देवठाण परिसरात मोठ्या प्रमाणात बिबट्यांची शोध मोहीम सुरू केली असून परिसरात बारा पिंजरे लावले आहेत. काल दुपारी दोन बिबट्यांना पकडण्यात वनखात्याला यश आले आहे. मात्र गावकऱ्यांनी पकडलेल्या बिबट्याला आमच्या ताब्यात द्या, असा आग्रह धरल्यामुळे काही काळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. वनरखात्याची रेस्क्यू टीम देवठाण मध्ये दाखल झाली असून वन कर्मचाऱ्यांचा मोठा फौजफाटाही आला आहे. मृत मुलीच्या कुटुंबियांना २५ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यातील दहा लाख रुपयांचा धनादेश काल मुलीच्या वडिलांकडे सुपूर्त करण्यात आला. तर १५ लाख रुपये ठेव म्हणून ठेवण्यात येणार आहे.

देवठाण गावातील हिवरगाव रोड लगत असलेल्या शेळके वस्ती नजिक राहणाऱ्या लहानू पोपट गांगड यांच्या तीन वर्षीय कविता नावाच्या चिमुकलीचा बिबट्याच्या हल्ल्यात मंगळवारी सायंकाळी मृत्यू



झाल्याची दूर्दवी घटना घडली होती. गेल्या तीन महिन्यातील बिबट्याच्या हल्यात मृत्यू झाल्याची गावातील दुसरी व तालुक्यातील ही चौथी घटना आहे. नरभक्षक बिबट्यांनी देवठाण परिसरासह संपूर्ण तालुक्यात उच्छाद मांडला असून नागरिकांचा संताप अनावर झाल्याने वनाधिकाऱ्यांनी मोठी रेस्क्यू टीमच पाचारण केली. अखेर एक बिबट मादी व तिचे पिल्लू अशा दोन बिबट्यांना जेरबंद केले. परिसरातील अन्य बिबट्यांना पकडण्यासाठी वन अधिकारी आणि रेस्क्यू टीम रानोमाळ सैरभैर होत बिबट्यांचा शोध घेत आहे.

वन परिक्षेत्र अधिकारी (रो ह यो) प्रकाश डोंगरे यांना चांगलेच धारेवर धरून बिबट्याच्या हल्यात अवघ्या तीन वर्षाच्या चिमुकलीचा करूण अंत झाला, सांत्वन भेटीने आमची माणसे परत येणार आहेत का? असा संतप्त सवाल उपस्थित करत उद्या बिबट्याचे काही बरे वाईट झाल्यास आम्ही नाही तर वन विभाग जबाबदार राहील, असा इशारा यावेळी ग्रामस्थांनी वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांना दिला.

देवठाण परिसरातील ही दुदैवी घटना घडली. ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. तब्बल ३०० मीटर दूर अंतरावर छिन्नविछिन्न अवस्थेत छोट्या कविताचा मृतदेह ऊसाच्या फडात मंगळवारी रात्री आढळून आला. तीन महिन्यांपूर्वी देवठाण गावातील रामहरी काळे यांच्या वस्तीवर ही हल्ला केला होता. या हल्यात विठाबाई रामहारी काळे यांचा मृत्यू झाला होता. २१ सप्टेंबरला पप्पू दुधवडे या २२ वर्षीय मजुरी करणाऱ्या आदिवासी मुलाचा बेलापूर बदगी परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला. यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाणे मुश्किल झाले असून रात्री सुद्धा बिबट्या मानववस्तीत भक्ष शोधण्यासाठी फिरताना आढळून येतात. वनविभागाने तातडीने कारवाई करून नरभक्षक बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली. मयत कविताचे कोतुळ ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. या महिन्याअखेरीस कविताचा वाढदिवसही होता. ऐन दिवाळीत या चिमुकलीचा करुण अंत झाल्याने गांगड कुटुंबावर दुः खाचा डोंगर कोसळला आहे.

पोलिस निरीक्षक मोहन बोरसे व त्यांचे सहकारी हेही देवठाण येथे आले. ग्रामस्थांनी कविताच्या अंत्यविधी अगोदर काही काळ देवठाण येथे रास्ता रोको आंदोलन केले व वनविभागाच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

# प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी २८ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार

## आयोगाकडून मतदार याद्यांचा कार्यक्रम घोषित

**मुंबई (प्रतिनिधी)–** विरोधी पक्ष महाविकास आघाडीने सदोष मतदार याद्यांबद्दल प्रश्न उपस्थित केले असताना राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी रात्री उशीरा मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला. त्यानुसार महापालिका निवडणुकीसाठी पुढील महिन्यात २८ नोव्हेंबरला प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

राज्यातील २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका पुढील वर्षी जानेवारी महिन्यात अपेक्षित आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून महानगरपालिका निवडणुकीसाठी तयार केलेली प्रारुप मतदार यादी महापालिका प्रशासनाने ६ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करावी.

या प्रारुप यादीवर ६ ते १४ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान हरकती आणि सूचना मागवल्या जाणार आहेत. तर २८ नोव्हेंबर रोजी हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय मतदार याद्या प्रसिद्ध करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. त्याचबरोबर ४ डिसेंबर रोजी मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करून १० डिसेंबर रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करावी, करावे असे राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे.

# वारंवार वांबोरी खुला तर बारागाव नांदूर गटावरच आरक्षण का?- पानसंबळ

**राहुरी (प्रतिनिधी)–** नुकत्याच जाहीर झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांच्या आरक्षणामुळे पुन्हा एकदा वांबोरी व बारागाव नांदूर जिल्हा परिषद गट चर्चेत आले आहे. गेल्या अनेक पंचवार्षिक निवडणुकांत सातत्याने बारागाव नांदूर गटावर वेगवेगळे आरक्षण लादले गेले असून, अद्यापही तो सर्वसामान्य प्रवर्गासाठी खुला झालेला नाही. याविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत युवा नेते धीरज पानसंबळ यांनी एका गटावरच वारंवार आरक्षण आणि दुसरा गट कायम खुला कसा? असा थेट सवाल उपस्थित केला आहे.

धीरज पानसंबळ म्हणाले की, गेल्या ४० वर्षांपासून वांबोरी जिल्हा परिषद गट सर्वसामान्य प्रवर्गासाठी खुला आहे. दुसरीकडे, बारागाव नांदूर गट हा एकही वेळा खुला न झाल्यामुळे सामान्य जनतेमध्ये रोष आहे. वांबोरी गटात अनुसूचित जाती-जमातीचे लोक राहत नाहीत का? किंवा बारागाव नांदूरमध्ये इतर प्रवर्गातील नागरिक नाहीत का? जर सातत्याने एकाच गटावर आरक्षण लादले जात असेल, तर तो सामाजिक न्यायाचा आधार न राहता, राजकीय समीकरणांचे आणि दबाव तंत्राचे साधन बनते. त्यामुळे निवडणूक आयोग आणि प्रशासनाने याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद गट आरक्षित असेल, तर त्या भागातील पंचायत समिती गण तरी खुला ठेवला जावा, अशी संतुलित आरक्षण प्रणाली राबवण्याची आवश्यकता आहे. मात्र वास्तवात दोन्हीही गण आरक्षित ठेवले जातात, ज्यामुळे नवख्या आणि सामान्य पार्श्वभूमीतून येणाऱ्या युवकांचे राजकीय नुकसान होत आहे. यामुळे त्यांच्यात असलेली नेतृत्व क्षमता, लोकांसाठी काहीतरी करण्याची इच्छा ही दाबली जाते, असेही ते म्हणाले.

प्रशासन आणि निवडणूक आयोगाने मागील निवडणुकांचा आराखडा तपासून एखाद्या गटावर वारंवार लादले जाणारे आरक्षण थांबवावे, अशी मागणी धीरज पानसंबळ यांनी केली आहे.

## राहाता बाजार समितीत डाळिंब २५५ रुपये किलो

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता बाजार समितीत बुधवारी डाळिंबाला प्रति किलो सर्वाधिक २५५ रुपये भाव मिळाला.

डाळिंबाच्या १९६६ कॅरेटची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला १७१ ते २५५ रुपये भाव मिळाले. डाळिंब नंबर २ ला १११ ते १७० रुपये भाव मिळाले. डाळिंब नंबर ३ ला ५६ ते ११० रुपये भाव मिळाले. डाळिंब नंबर ४ ला १० ते ५५ रुपये प्रति किलो भाव मिळाले. ड्रॅगन फ्रुटची ११ कॅरेटची आवक झाली. ड्रॅगन फ्रुटला किमान २० रुपये, जास्तीत जास्त ३५ रुपये तर सरासरी २५ रुपये भाव मिळाले.

सीताफळाची २५९ कॅरेटची आवक झाली. सीताफळाला ५ ते ४० रुपये तर सरासरी २० रुपये भाव मिळाले. संत्रीची ६६ कॅरेटची आवक झाली. संत्रीला ५ ते ३५ रुपये तर सरासरी २० रुपये प्रति किलो भाव मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

# सामाजिक भान सदैव मनात ठेवून लेखन करावे लागते- जगताप

## अकोलेत ‘समर्पित क्षितिजं’ पुस्तकाचे प्रकाशन

**अकोले (प्रतिनिधी)–** सामाजिक भान सदैव मनात ठेवून लेखन करावे लागते. ग्रामीण वास्तवाचे प्रगल्भ चित्रण मांडल्यामुळे लेखन रसिकांचा ठाव घेते. मानवी भावभावनांचा नेमका स्पर्श, उपरोध, विनोद व अंतर्मुख निरीक्षण यांमुळे लेखन सकस होते. नवीन लेखन करणाऱ्या लेखकांनी याची जाणीव ठेवावी, असे प्रतिपादन लेखक, दिग्दर्शक, कवी, गीतकार अरविंद जगताप यांनी केले.

अकोले महाविद्यालयाच्या के. बी. दादा देशमुख सभागृहात यशोदीप पब्लिकेशन्स पुणे प्रकाशित व राजेंद्र भाग्यवंत लिखित ‘समर्पित क्षितिजं’ या




पुस्तक प्रकाशन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पद्मश्री राहीबाई पोपेरे होत्या. अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, प्रा. बबन महाले, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश टाकळकर, गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, शिक्षणतज्ज्ञ भाऊसाहेब चासकर, जादूगार पी. बी. हांडे आदी उपस्थित होते. यावेळी लेखक अरविंद जगताप यांनी स्वतः आपण लेखक कसे झालो याचा जीवनपट उलगडून सांगितला. बीजमाता पोपेरे यांनी राजेंद्र भाग्यवंत यांचे हे पुस्तक नक्कीच उंचीवर जाईल, असा विश्वास व्यक्त केला. या पुस्तकाचे प्रकाशक पुणे येथील रूपाली अवचरे व निखील लंबाते आहेत. मुखपृष्ठ राजेंद्र मालुंजकर यांनी बनविले. प्रस्तावना रानकवी तुकाराम धांडे यांची लाभली असून मागील मलपृष्टावरील लेख डॉ. कैलास दौंड यांचा आहे. यावेळी मान्यवरांसमोर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी डॉ. रजंना कदम लिखीत संविधानावर आधारित पथनाट्य सादर केले. सूत्रसंचालन लेखक दीपक पाचपुते यांनी केले तर आभार लेखक भाऊसाहेब कासार यांनी मानले.

# मंदिराचा परिसर स्वच्छ करुन डॉ. कलाम यांना अभिवादन

**अकोले (प्रतिनिधी)–** मॉडर्न हायस्कूल ज्युनियर कॉलेज, अकोले, संलग्न राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस) +२ स्तर स्वंयसेवकांनी माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने अकोले शहरातील प्राचीन सिद्धेश्वर मंदिराचा परिसर स्वच्छ करत डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना



अभिवादन केले.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. संपत वाळके यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जीवनपट व त्यांच्या कार्याविषयी स्वंयसेवकांना माहिती दिली. तसेच स्वंयसेवकांना वाचनाची आवड निर्माण व्हावी याबाबत महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.

याप्रसंगी सह-कार्यक्रमाधिकारी प्रा. केदार भिंगारदिवे, ऋषिकेश नगरकर व मंगल कोल्हे उपस्थित होत्या.

## बसने तरुणास चिरडले

**अकोले (प्रतिनिधी)–** अकोले आगाराच्या बसने एका ४२ वर्षीय इसमाला चिरडल्याची दुर्दैवी घटना पिंपळगाव नाकविंदा येथे रात्री ८ ते ९ वाजेच्या दरम्यान घडली. गणपत भानुदास लगड (वय ४२) असे या घटनेतील मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत माहिती अशी, अकोले आगाराची अकोले-देवगाव ही बस नेहमीप्रमाणे सायंकाळी देवगाव येथे मुक्कामी जात होती. पिंपळगाव नाकविंदा येथे गणपत भानुदास लगड हे रस्त्यावरून पायी घरी जात होते. बस गणपत लगड यांना रस्त्यावर चिरडून पुढे निघून गेली. ही घटना काही नागरिकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांना माहिती दिली. सदर मृत व्यक्तीचा मृतदेह कोतूळ येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे.

# शरदचंद्र पवार पतसंस्थेला नाशिक विभागातील प्रथम पुरस्कार

**कोपरगाव (प्रतिनिधी)–** कोळपेवाडी-सुरेगाव परिसरातील कर्मवीर शंकरराव काळे यांनी स्थापन केलेल्या आणि माजी आ. अशोकराव काळे तसेच आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली अग्रेसर असलेल्या पद्मविभूषण डॉ. शरदचंद्र पवार पतसंस्थेला राज्य पतसंस्था फेडरेशनचा नाशिक विभागातील प्रथम पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

पतसंस्था फेडरेशनच्या नाशिक विभागाच्या वतीने ५ कोटी ते ५० कोटीच्या ठेवी गटातील पतसंस्थांमध्ये प्रथम पुरस्कार कर्नाटक राज्यातील कुमटा येथे पार पडलेल्या कार्यक्रमात श्रीकृष्ण वाडेकर, फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे, संचालक अनिल महाले, मॅनेजर मंगेश देशमुख यांनी हा पुरस्कार स्वीकारला. त्याबद्दल अशोकराव काळे, आ. आशुतोष काळे यांनी अभिनंदन केले आहे.

यापूर्वीही पतसंस्थेला सलग दोन वर्ष बँको ब्लू रिबन पुरस्कार मिळालेला आहे. संस्थेचे भागभांडवल वाढीचे प्रमाण, ठेवी वाढीचे प्रमाण, उत्पन्न व खर्चाचे प्रमाण, अनुत्पादक कर्जाचे प्रमाण, सी. आर. आर., एस. एल. आर., सी. आर. ए. आर. या व इतर अनेक बाबतीत संस्था सहकार खात्याच्या नियमांचे सातत्याने तंतोतंत पालन करत आहे. संस्थेच्या पारदर्शक कारभारामुळे ठेवीदार, सभासद व हितचिंतक यांचा विश्वास वाढत असून, संस्थेने चालू वर्षी सप्टेंबर अखेर ५० कोटींचा टप्पा पार केला आहे. ग्राहकांसाठी लॉकर सुविधा, डिजिटल बँकिंग सुविधा आणि नियमितपणे १५ टक्के लाभांश देण्याची परंपरा कायम ठेवली आहे. हा पुरस्कार म्हणजे संस्थेच्या सामाजिक बांधिलकीची आणि आर्थिक प्रगतीची पावती आहे. या सन्मानामुळे संस्थेच्या संचालक मंडळाला नवीन ऊर्जा मिळाली आहे. भविष्यातही अधिक पारदर्शकता, शिस्तबद्ध व्यवहार आणि जनहित केंद्रस्थानी ठेवून काम करणार असल्याचे संस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे यांनी सांगितले.

पान १ वरुन

## ६१ नक्षलवाद्यांचे सशस्त्र...

विकासकामांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे नवीन माओवाद्यांची भरती रोखली, या ऐतिहासिक कामगिरीबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलीस दल आणि केंद्रीय राखीव दलाचे अभिनंदन करत गडचिरोली पोलीस दलाला १ कोटी रुपयांचा पुरस्कार जाहीर केला. तसेच सजग राहण्याचे आणि लोकांचा यंत्रणेवरील विश्वास अधिक दृढ करण्याचे आवाहन केले.

गडचिरोलीत मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक येत असून, हा जिल्हा स्टील मॅग्नेट बनत आहे. गुंतवणूक करणाऱ्यांना ९० टक्के स्थानिकांना रोजगार देण्याच्या अटीवरच परवानगी दिली जात असून, १ लाख स्थानिकांना रोजगार देण्याचा मानस आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. गडचिरोलीत पायाभूत सुविधा उभारताना जल, जमीन, जंगल यांचा विनाश होऊ नये यासाठी ५ कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. पुढील काळात गडचिरोलीला देशाचे ग्रीन स्टील हब तयार करण्यासाठी योजना आखल्या जात असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## शिर्डीतील मुख्य सूत्रधार...

सुरूवातीला राहाता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर शिर्डी पोलीस ठाण्यात देखील यासंदर्भातील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोन्ही गुन्ह्यांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असून सहायक पोलीस निरीक्षक युवराज आठरे हे या गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

तपासादरम्यान १६ जुलै २०२५ रोजी मुख्य सूत्रधार भूपेंद्र सावळे याला अटक करण्यात आली. पोलीस कोठडीत चौकशीतून सावळे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी ‘ग्रो मोअर’ या नावाने अनेक कंपन्या स्थापन केल्याचे उघड झाले. त्यामध्ये ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट फायनान्स, ग्रो मोअर फिनकेअर सर्व्हिसेस, ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट आणि ग्रो मोअर स्वराज्य कॅपिटल या कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांमार्फत कोणतीही आर्थिक परवानगी नसताना नागरिकांकडून कोट्यवधी रूपयांची बेकायदेशीर वसुली करण्यात आली. त्यांना परतावा दिला गेला नाही व गुंतवणुकीची रक्कम देखील परत मिळाली नाही. पोलिसांनी गुंतवणूकदारांचे जबाब नोंदवून, संबंधित पुरावे गोळा करून, भूपेंद्र सावळे विरोधात राहाता येथील एमपीआयडी विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

## श्रीरामपूर, कोपरगाव, राहाता...

चिंता वाढली आहे. अगोदरच पावसामुळे पिके गेली आहेत. वाचलेली पिकेही आता धोक्यात आली आहे. वेचणीला आलेला कापूस आणि सोयाबीनला पुन्हा फटका बसण्याची चिन्हे आहेत.

## राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष फाळके...

बरोबर ठाम राहण्याचा निर्णय घेतला. मात्र, त्यांच्या अचानक राजीनाम्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय पक्षासाठी धक्कादायक मानला जात आहे. राजीनाम्यानंतर जिल्हाध्यक्षपदावर कोणाची नियुक्ती होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ‘सेवा पंधरवडा’तून शेतकऱ्यांना...

कर्ज घेण्यात अडचणी येत होत्या. या उपक्रमात अशा जमिनींना वर्ग-१ चा दर्जा देऊन शेतकऱ्यांना पूर्ण मालकी हक्क प्रदान करण्यात आला.

विविध शासकीय प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्त नागरिकांना वाटप केलेल्या वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्याचे काम या सेवा पंधरवड्यात विशेष गतीने पार पडले. एकूण प्रकल्पबाधित ७/१२ धारक २ हजार १७४ होते, यापैकी १ हजार ३८४ अर्ज पात्र ठरले. वर्ग-१ चे आदेश पारित झालेले अर्ज एकूण ६६८ (यात आधीचे ६०१ आणि या आठवड्यातील ६७) आहेत, तर शिल्लक ८६१ अर्ज प्रलंबित आहेत. प्रलंबित अर्जही लवकरच निकाली काढले जातील, ज्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या अनेक वर्षांच्या त्रासाला पूर्णविराम मिळणार आहे.

**‘लाभार्थी सत्यापन अ‍ॅप’वरदान**

शासनाच्या विविध सामाजिक योजनांचा लाभ घेण्यासाठी वयोवृध्द, विधवा तसेच दिव्यांग लाभार्थ्यांना दरवर्षी हयातीचे प्रमाणपत्र सादर करावे लागते. यासाठी त्यांना तहसील, पंचायत समिती किंवा इतर शासकीय कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत असत. मात्र, अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाने विकसित केलेल्या ‘लाभार्थी सत्यापन अ‍ॅप’मुळे ही प्रक्रिया आता घरबसल्या सुलभ झाली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात केंद्र पुरस्कृत योजनांतील ३८ हजार ८०२ लाभार्थ्यांपैकी ११ हजार ३७२ लाभार्थ्यांनी या प्रणालीचा लाभ घेतला आहे. राज्य पुरस्कृत योजनांनाही ही सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही सुरू असून, या उपक्रमामुळे लाभार्थ्यांचा वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणात वाचत आहे. शासनाची सेवा आता प्रत्यक्ष जनतेच्या दारी पोहोचत आहे.

# द्रोणा स्कूलमध्ये रंग उत्सव स्पर्धा




**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये डॉक्टर अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस विश्व विद्यार्थी दिवस व राष्ट्रीय रंग उत्सवातील सहभागी व विजयी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा स्कूल व कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय रंग उत्सव स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता. त्या विद्यार्थ्यांना विश्व विद्यार्थी दिवसाच्या निमित्ताने पारितोषिक वितरण करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक निभांश संभाजी दंडवते (ग्रेड २) या विद्यार्थ्याने पटकावला. कलरिंग कॉम्पिटिशनसाठी त्याला स्केट स्कुटी, ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले. द्वितीय क्रमांक सानवी वैभव भोंगळे (ग्रेड ९) यांना ग्रीटिंग कार्ड कॉम्पिटिशनमध्ये फाईव्ह स्टार ब्रिलियंट अवार्ड मिळाला. या विद्यार्थिनीला ट्रॉफी, मेडल्स व प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी ग्रेटिंग कार्ड स्पर्धा, कलरिंग स्पर्धा, फिंगर आणि थम स्पर्धा, स्केचिंग स्पर्धा, कार्टून मेकिंग स्पर्धा, कलरिंग स्पर्धा, स्केचिंग स्पर्धा इत्यादी स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला होता. यामध्ये विद्यार्थ्यांना ट्रॉफी, गोल्ड मेडल, सिल्वर मेडल, ब्रॉंझ मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच राष्ट्रीय रंग उत्सव स्पर्धेमधील विजय विद्यार्थ्यांना द्रोणा अकॅडमीच्या संचालिका प्राजक्ता दंडवते यांच्या हस्ते ट्रॉफी, मेडल्स आणि प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना देण्यात आली. द्रोणा अकॅडमीच्या कलाशिक्षिका साक्षी हर्षल गुरव यांना रंग उत्सव स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. प्राजक्ता दंडवते यांना ट्रॉफी देण्यात आली. प्रास्ताविक द्रोणा अकॅडमीच्या प्राचार्या अनिता रोहोम यांनी केले. संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ता दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम, शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सूत्रसंचालन मरलीन जॉन यांनी केले.